## वसई विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

**प्रेस नोट** दि.१०/१०/२०२४

### ‘जागतिक मानसिक आरोग्य दिन’

दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस **‘जागतिक मानसिक आरोग्य दिन’** म्हणून साजरा केला जातो. यावर्षीची थीम **‘Mental Health at Work Place’** असून कामाच्या ठिकाणी तणाव निर्माण होणे व यामुळे मानसिक आजार आणि कर्मचाऱ्यांच्या जीवनावर होणारे परिणाम याकरिता मानसिक आरोग्याच्या समस्येबाबत जागरुकता निर्माण होणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यकार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्येबाबत जागरुकता निर्माण करणे करिता मा. आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाने आणि मा. अतिरिक्त आयुक्त, श्री. संजय हेरवाडे यांचे पुढाकाराने दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता महासभा हॉल, मुख्यालय, विरार (प.) येथे आरोग्य शिबीर आयोजि करण्यात आले होते. सदर आरोग्य शिबीरास मार्गदर्शन करणेकरिता मानसोपचार तज्ञ डॉ. सुरेश पाटील, अध्यक्ष-नालासोपारा मेडिकल असोसीएशन उपस्थित होते. त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्य विषयी कामाच्या ठिकाणी येणारा तणाव, वैयक्तिक जीवानातील नैराश्य, चिंता इत्यादींचे व्यवस्थापन कसे करावे? आणि जीवनशैलीतील बदल, व्यायाम, वाचन, फिरायला जाणे, पोषक आहार इ. गोष्टीमुळे तणाव सहज नियंत्रणात आणले जाऊ शकतो असे मोलाचे मार्गदर्शन दिले. या आरोग्य शिबीरास श्री. समीर भूमकर मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य), श्री. सदानंद पुरव, मा.उपायुक्त (आस्थापना),डॉ. भक्ती चौधरी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री. दिलीप पालव, मुख्य अग्निशमन अधिकारी तसेच विभाग प्रमुख व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**